# बिनबोल... बिनमोल...

## शेतीवरील अरिष्ट आणि स्त्रियांवरील हिंसा

SOPPECOM | मकाम Makaam

### बिनबोल... बिनमोल... पोस्टर संचाबद्दल

महाराष्ट्र हे भारतातील दुसऱ्या क्रमांकाचं कोरडवाहू राज्य असून इथे दारिद्र्याचं प्रमाण मोठं आहे. शेतीवरील अरिष्टामुळे अनेक दशकांपासून सक्तीचं स्थलांतर आणि असह्य आर्थिक कोंडीमुळे शेतकरी-शेतमजूर व कष्टकऱ्यांच्या आत्महत्यांमध्ये वाढ होताना दिसत आहे. ग्रामीण महिलांच्या रोजच्या जगण्यातला संघर्ष आणि हिंसेमध्येही वाढ झाली आहे. या स्त्रियांचे अनुभव काय आहेत हे समजून घेण्यासाठी सोपेकॉम, पुणे आणि महिला किसान अधिकार मंच (मकाम) तर्फे एक अभ्यास हाती घेण्यात आला. शेतीवरील अरिष्टाच्या संदर्भात ग्रामीण महिलांना सहन कराव्या लागणाऱ्या हिंसेचं स्वरूप, प्रकार, आणि परिणाम समजून घेणे हा या अभ्यासाचा मुख्य उद्देश होता.

हा अभ्यास महाराष्ट्र, तेलंगणा आणि पंजाब या तीन राज्यांमध्ये करण्यात आला. अभ्यासासाठी स्त्रीवादी संशोधनपद्धतींचा वापर करण्यात आला आणि यामध्ये ३,००० हून अधिक शेतकरी आणि शेतमजूर महिला सहभागी झाल्या.

या अभ्यासातून पुढे आलेल्या काही ठळक बाबी या पोस्टर संचातून पुढे आणण्याचा प्रयत्न केला आहे. शेतीवरील अरिष्ट, वातावरण बदल, आर्थिक कोंडी, कामाची वानवा या सगळ्यांसोबतच स्त्रियांचे रोजचे कष्ट, काम शोधण्यासाठी करावा लागणारा आटापिटा, कर्जाचा बोजा आणि हिंसा व शोषणाचे अनुभव यावर हा पोस्टर संच प्रकाश टाकतो. तसंच अशा परिस्थितीतही स्त्रिया मार्ग काढतात, पर्याय शोधतात आणि आपल्या मागण्या मांडतात हेही यात मांडलं आहे.

**ऋणनिर्देश**

या अभ्यासात सहभागी झालेल्या महाराष्ट्र, तेलंगणा आणि पंजाबमधल्या सर्व शेतकरी व शेतमजूर महिलांचे आम्ही मनापासून आभारी आहोत. त्यांनी आपला वेळ दिला आणि वेदनादायी असले तरी अतिशय मोलाचे असे आपले अनुभव सांगितले, आलेल्या संकटावर मात करण्यासाठी केलेले प्रयत्न आमच्यासमोर मांडले. त्याबद्दल आम्ही त्यांचे ऋणी आहोत.

संशोधनामध्ये सहभागी गावांमधील आशा व अंगणवाडी कार्यकर्त्या, सरपंच, ग्राम पंचायत सदस्य आणि कर्मचारी, पोलीस पाटील आणि शासकीय केंद्रांमधील समुपदेशक अशा सर्वांनी गावपाड्यातलं जीवन आणि त्यातील समस्यांबद्दल अगदी सखोल माहिती दिली. त्यांचेही आभार.

महिला किसान अधिकार मंच (मकाम), सहभागी सामाजिक संघटना आणि तिन्ही राज्यातील शेतकरी संघटनांचेही आम्ही ऋणी आहोत.

**संशोधनः** महाराष्ट्र, तेलंगणा व पंजाब या राज्यातील संशोधन गट
**पोस्टर संचाची संकल्पना व लेखनः** मेधा काळे आणि सोपेकॉम टीम (स्नेहा भट, सीमा कुलकर्णी, ऋचा वसुमती सतीश, वनिता तुमसरे)
**चित्रे व मांडणीः** राजू देशपांडे

# आम्ही कोण?



शेतकरी

शेतमजूर

भूमीहीन

हाताखाली राबणाऱ्या

गुत्तं घेऊन काम करणाऱ्या

जंगलातून वन उपज आणणाऱ्या

गुरं राखणाऱ्या


शेतमाल विकणाऱ्या

ऊस तोडणाऱ्या

मासे धरणाऱ्या

रोजगार हमीवर मजुरी करणाऱ्या

# आम्ही कोण?



'वरच्या आळीतल्या'
'खालच्या आळीतल्या'
वेशीच्या आतल्या
गावकुसाबाहेरच्या
दलित आदिवासी
भटक्या एकल
विवाहित विधवा
मालकिणी कारभारणी
मोलकरणी

# आमचं काम

शेतात गोठ्यात

जंगलात माडात ऊसाच्या फडात

रोजगार हमीवर बांधकामावर

चारणीत चारा छावणीत

द्राक्षाच्या मळ्यात माशाच्या तळ्यात

बाजारपेठेत शहराच्या वाटेत




# आमचं काम

## जिवाहून प्यारं
## जिवावर येणारं
## जीव घेणारं
## बिनबोल, बिनमोल

"कीटकनाशकं वापरून हात खराब झालेत, डोळ्यांनाही त्रास होतोय.
पण आजारी असलं तरी दवाखाना कुठं आहे?
आणि जरी असला तरी पैसे कुठं आहेत?"
- शेती कसणारी महिला, मु. बोरी, जि. परभणी

"आम्ही बियाण्याच्या कंपन्यांमध्ये काम करतो. पण ते काम फार कष्टाचं असतं.
तिथले लोक कडक नजर ठेऊन असतात आणि सारखे पटपट काम करा म्हणून ओरडत असतात.
संडासला सुद्धा जाऊ देत नाहीत. बोलू देत नाहीत.
पाळीच्या काळात कसं करायचं म्हणून कामावर खाडा करायला लागतो."
- विस्थापित दलित शेतमजूर महिला, मु. संगापूर पुनर्वसन कॉलनी, जि. सिद्दिपेट, तेलंगणा



# आमचं काम

## कुठे गेलं? कुणी नेलं?

"आता कुठं राहिली एवढी कामं? ट्रॅक्टर निघाले, जेसीबी निघाले.
लोक तणनाशक फवारतात. निंदायला काही राहिलं नाही.
कशी भरायची आम्ही आमची पोटं?"
- शेतमजूर महिला, मु. जांब, जि. परभणी

"शेतातून अन्न धान्य मिळत नाही. मग दुकानदाराची पण उधार करावी लागते.
केवळ जगण्यासाठीच सारखे कर्ज घेत रहावं लागतं आणि ते फेडण्यासाठी काम शोधत फिरावं लागतं."
- परित्यक्ता शेतमजूर महिला, मु. बाभूळगाव, जि. परभणी

"पूर्वी भातकाढणीला गेलो तर दिवसाला ३०० रुपये मिळायचे.
गुत्तं घेऊन टोळीने गेलो तर आम्हाला प्रत्येकीला १५-२० किलो भात आणि रोख मजुरी मिळायची.
वर्षभरासाठी पुरेसं धान्य मिळायचं. या मिशनी आल्या आणि सगळंच बदललं.
कामही गेलं आणि वर धान्यासाठी पैसा खर्च करावा लागतो तो वेगळाच."
- आदिवासी शेतमजूर, मु. नाइकपुगुडा, जि. मंचिर्याल, तेलंगणा



# आमचं काम ठरतं,

## निसर्गाच्या मर्जीवर, पावसाच्या लहरीवर
## कंपन्यांच्या संशोधनावर,
## नवनव्या यंत्र-तंत्रांवर
## बदलत्या शेतीवर, समाजाच्या रीतीवर
## आर्थिक नीतीवर, भुकेच्या भीतीवर




"कधी पण पाऊस पडतो, तूर पेरली ती पण गेली,
हरबरा पण गेला, आता बियाणं खतं महाग झालीत.
कशी शेती करायची, म्हणून मक्त्याने शेती दिली.
तीन तीन वेळा पेरलं. पावसामुळे सगळ गेलं.
खर्च पण एक ते दीड लाख केला होता.
पाच एकर शेती होती. पावसामुळे सगळ शेत गेलं.
तूर, कापूस काहीच नाही झाला."

शेतकरी महिला, तीरझडा, जि. यवतमाळ

# कामाच्या शोधात

रानात, गावात, शहरात, महानगरात
वीटभट्टीवर, रोजगार हमीवर
तूर-सोयाबीन काढायला, मिरची तोडायला
कापसाची वेचणी, द्राक्षाची काढणी



# उसाचा फड



## नड
## कढ

“सर्व महिला ऊस तोडून
खोपीवर परत येत असताना,
एका शेतात मक्याची कणसं दिसली.
खायला म्हणून काही कणसं तोडून
सर्व महिला शेतातून बाहेर पडल्या.
माझ्यासोबत माझा छोटा मुलगा होता.
बाहेर पडायला उशीर झाला.
तेवढ्या वेळात शेतकरी मालक तिथे आला
आणि घाण भाषेत शिवीगाळ करत म्हटला,
'तोडलेली कणसं झाडाला जोडून दे
नाहीतर माझी इच्छा पूर्ण कर.'
त्या शेतकऱ्याला विरोध केला
तर टोळीवर येऊन बोलेल आणि
परत सगळ्यांकडून बोलणी खावी
लागणार या सगळ्या विचारातून
मी तिथेच जमिनीवर झोपले
व त्या शेतकऱ्याला म्हणाले,
'तुम्हाला जे पाहिजे ते तुम्ही घ्या'.”

- महिला ऊसतोड कामगार

# आमचं काम, कामाचं ठिकाण किती सुरक्षित?

"मालक सारखे म्हणतात जेवण लवकर करा.
आम्ही किती वेळ जेवत आहोत हे मालक घड्याळ लावून बघतात."
- शेतमजूर, मु. मासा, जि. अकोला

"शेतात पाणी प्यायला नसल्याने,
तिथले लोक मुद्दाम आम्ही तुला
विहिरीतून पाणी काढून देतो असं म्हणतात.
तर कधी एकटीला मुद्दाम मागे राहून
गवत उचलायला भाग पाडतात."
- शेतमजूर महिला, मु. बाभूळगाव, जि. परभणी



# हिंसाचाराचे विविध प्रकार

मारहाण

शिवीगाळ

डांबून ठेवणे

इच्छेविरुद्ध सलगी

जातीवरून शिवीगाळ

बलात्कार

छेडछाड

आर्थिक शोषण

पाठलाग



# ही हिंसा आहे कामाच्या ठिकाणी होणारी!

**कामासाठी थांबायला लावणं,**
**मदत करण्याच्या बहाण्याने अंगलट येणं**
**जातीमुळे ठराविक कामं न देणं**
**शेण गोळा करण्यासारख्या कामाला मान नाही**
**एकल महिलेवर मजुरांकडून, नातेवाइकांकडून अरेरावी**

"रात्रीच्या वेळी अंधारात लघवीला
खोपीपासून थोडं लांब जावं
असा विचार करत होते.
पण रोडच्या कडेला
त्याच गावातले काही पुरुष
उभे असलेले दिसले म्हणून
जवळपास जागा शोधू लागले.
सातवा महिना सुरू होता.
मला एकटीला बघून
ते लोक मागे आले.
त्यातील एकाने हात पकडला.
मी जोरात ओरडले.
टोळीत एकदम
खळबळ व्हायला लागली
आणि पकडलं
जाण्याच्या भीतीने
ती माणसं पळून गेली."
- महिला ऊसतोड कामगार



# ही देखील हिंसाच आहे, कामासोबत येणारी!

“शेतमालक खूप त्रास देतात. आमचं काम फिरुन शिकार करायचं.
आम्ही आमच्या जंगलात फिरत होतो.
तर तो म्हणे 'तुम्ही आमच्या शेतात येऊन भाज्या घेतल्या.
चोरी केली.' पोलिसांकडे नेलं... असं बोलतच असतात लोक आम्हाला.”

- फासे पारधी शेतमजूर महिला, मु. मासा. जि. अकोला

“माझा नवरा गेल्यापासनं,
माझे दोन्ही दीर मला त्रास देत आहेत.
माझी जमीन त्यांच्या मध्ये आहे
आणि ते दोन्ही बाजूंनी हळूहळू
जमीन कोरत आहेत.
दरवर्षी ते त्यांचे तास वाढवतात.”

- विधवा शेतकरी, मु. चांदूर, जि. अकोला



# आम्ही करतो ते कामच आहे ना? मग जिथे करतो ते कामाचं ठिकाण का नाही?

## कामाच्या ठिकाणी होणारा लैंगिक छळ (प्रतिबंध) कायदा, २०१३

**कामाचे ठिकाण –**

- कार्यालय, कचेरी
- कामानिमित्त जावं लागतं अशी कुठलीही जागा
- कामावर जाताना करावा लागणारा प्रवास, वाहन



# ही हिंसा झाली
# -कामाच्या ठिकाणी
# -कामावर असताना
# -कामाच्याच संदर्भात

## आमचं कामाचं ठिकाण सुरक्षित नाही याची दखल कोण घेणार?



“मजुराच्या पाठीला फवारा असते,
15 लिटर पाणी घेऊन त्या माणसाला
स्वतः उठता येत नाही.
मग त्याला हात द्यायला लागतो.
पण ते काय करते... लेडीज बघून पुढंच ओढते.
मग आपण काय करायचं.”

- आत्महत्याग्रस्त कुटुंबातील विधवा शेतकरी,
मु. पिंपळगाव ठोंबरे, जि. परभणी

“मजूर लोक रात्री अपरात्री
पैसे मागायला घरी येतात.
हे सगळ टाळण्यासाठी
मी सावकाराकडून कर्ज घेवून
आधी त्यांना पैसे देते.”

- आत्महत्याग्रस्त कुटुंबातील विधवा शेतकरी,
मु. बोरी, जि. परभणी

SOPPECOM
Makaam

# माझ्याच शेतात मजुराने माझ्यावर हिंसा केली,

## तक्रार कुठे आणि कुणाविरुद्ध?

# बांधाला लागून शेती असलेल्या दिराने च त्रास दिला,

## तक्रार नक्की कसली? कामावर हिंसेची का घरगुती जाचाची?



SOPPECOM

Makaam

# आम्ही जगत राहतो

## शेती करण्यासाठी, शेत मिळवण्यासाठी, ताणाखाली, कामाच्या भाराखाली, कर्ज फेडत, घरच्यांशी लढत शिवाज म्हणून... नाईलाज म्हणून...

"बाईच्या भरोश्यावर ५ जणांचं कुटुंब चालतं.
कुटुंब हिच्या भरोश्यावर आणि दारूचे पैसेसुद्धा हिच्याच मजुरीवर."
- शेतमजूर महिला, मु. वरुड, जि. यवतमाळ

"एक कर्ज भरायला दुसरं कर्ज काढते, दुसऱ्यासाठी तिसरं काढते.
असं एका एका बाईवर दोन-दोन, तीन- तीन गटाच कर्ज हाये."
- आत्महत्याग्रस्त कुटुंबातील विधवा शेतकरी/शेतमजूर, मु. आंधबोरी, जि. यवतमाळ


"आमचं तर कर्जाचं चक्र आहे.
जात्यावर दळतो तसं."
- विधवा शेतमजूर, मु. वरुड,
जि. यवतमाळ



घर-दार,
चूल-मूल,
रोजचं भागवण्यासाठी
आटापिटा,
हवामानाचा भरवसा नाही,
हाताला पुरेसं काम नाही
जोखीम तेवढी नक्की



पेरलेलं उगवंल का,
उगवलं तर टिकंल का,
टिकलं तर विकंल का?
वाढती महागाई,
नापिकी आणि
आतबट्ट्याची शेती,
विळखा बेरोजगारी
आणि व्यसनाचा,
या कोंडीतून
मार्ग कसा काढायचा?



जोडीदाराने
अर्ध्या वाटेवर साथ सोडली...
घरच्यांनी झिडकारलं
समाजाने नाकारलं,



सरकारने तरी काय केलं?



# एकटी आहे म्हणून?

"मी वावरात चालली होती, कुत्रं हाय आमच्या घरी एक, ते पण माह्या सोबत होतं.
तर तो एक माणूस काय म्हने, 'कुत्र्याला नेयाच्या वाटणीचं माणसाला घेऊन जायचं ना'.
मी एकटी बाई... तसं बोलल्यावर मजुरी बुडवून घरी आले, इतकी भीती वाटली,
पुढचे काही दिवस मजुरीलाच गेले नाही."

- गटचर्चा, मु. वरुड, जि. यवतमाळ

"मी फायनान्समधून लेकराच्या दवाखान्यासाठी १२,००० रुपयांचं कर्ज घेतलं होतं,
जेव्हा फायनान्स वाले घरी हफ्ता मागायला आले तेव्हा माझ्याकड पैसे नव्हते,
पण ते बसून राहिले. शेवटी मी एका रात्रीत माझा कापूस अगदी पडेल त्या भावाला विकून त्यांना पैसे दिले."

- आत्महत्याग्रस्त कुटुंबातील विधवा शेतकरी/शेतमजूर, मु. डोंगरगाव, जि. अकोला

"आम्ही एका शेतकऱ्याच्यात कामाला गेलो पण महिना झाला माझ्या कामाचे पैसे दिले नाही.
मी जर एकटी नसते तर असं झालं असतं का?"

- शेतकरी महिला, तीरझडा, जि. यवतमाळ



# कर्जाचा बोजा जीव घेतो,
# नशेचा खेळ तरुणाई नासवतो

## बाई राहते मागे
## दुःख सोसत, कर्ज फेडत,
## रडत-लढत
## शासनाला हे दिसत नाही?



# वाघांना, चित्त्यांना, पक्ष्यांना 'अभय'



## विस्थापित केलेल्या आम्हाला काय?



# आमचं जंगल, शेती, भाती नद्या, तळी, सागर किनारे आमचा जीवनाधार

## तोच जीवनाधार काढून घेतल्यावर जगण्यासाठी करायचं काय?



शारीरिक, मानसिक,
सामाजिक स्वास्थ्य
म्हणजे आरोग्य.

असं निरोगी,
सुदृढ आयुष्य
जगण्याचा
अधिकार
आम्हाला
का नाही?



# हिंसेची बीजं फार खोल रुजली आहेत.

## समाजाची रीत बनलेलं हे हिंसेचं चक्र भेदायचंच!






# आम्ही लढतो, संकटावर मात करत...

"नवऱ्याने आत्महत्या केली.
३ मुली आणि पोटात एक मूल असताना सासरच्यांनी घराबाहेर काढलं.
जमिनीत, संपत्तीत वाटा मिळू दिला नाही.
माहेरी वडलांचा आधार होता.
शेतीमध्ये पेरणी आणि कापणीच्या वेळी मजूर कमी पडतात हे ओळखून मी तुंगा चालवू लागली.
तुंगा म्हणजे गुत्तं घेऊन मजूर पुरवणं.
माझ्याकडे १२०-१३० महिला मजूर असतात आणि
गरजेप्रमाणे बाहेरगावी देखील मजूर पुरवण्याचं काम मी करते.
माझ्या तुंग्यात सगळ्या जातीच्या महिला आहेत.
व्यवहार चोख असल्यामुळे बाया माझ्या तुंग्यामध्ये येतात.
मुलींवर लग्न करण्यासाठी दबाव आहे.
पण त्या माझ्यामागे खंबीरपणे उभ्या आहेत."

- आत्महत्याग्रस्त कुटुंबातील विधवा शेतमजूर, मु. कान्हेरी, जि. अकोला



# आम्ही झगडतो, चांगल्या आयुष्याची स्वप्नं साकार करत...

“मजुरीला जाताना कुणी सोबतीला असलं की सुरक्षित वाटतं. मी कधीच एकटी नाही जात कामाला.
मले धरून चालणाऱ्या दोघी जणी आहेत. त्या दोघींना सोडून मी कुठेच जात नाही.
त्या मले टाकत नाही, अन मी त्यांना टाकत नाही. आम्ही ९ वर्षांपासून सोबत आहोत.”
“हा गट मोठा होत गेला आणि माझ्याकडे 'मेट'ची जबाबदारी आली.
एरवी मेट असलेली व्यक्ती गटातल्या प्रत्येकाकडून थोडं कमिशन घेते.
पण मी कोणताही मोबदला न घेता काम करते.
शेतकऱ्याशी संपर्क ठेवायचा, कामाला जायचं,
मजुरीचा हिशोब ठेवायचा, हे सगळं मी चोखपणे करते.
माझ्यासोबत १०-१२ बाया आहेत.
एकमेकीला समजून, सांभाळून घेतो.
गट असला की रोजमजुरी मिळायची
शक्यताही वाढते असं वाटतं.”
- आत्महत्याग्रस्त कुटुंबातील विधवा शेतकरी,
मु. झाडगाव, जि. यवतमाळ

“गावातल्या दारुच्या अवैध दुकानांविरोधात
मी बायांना एकत्र केलं.
घरच्यांनी विरोध केला
पण मी मागे हटले नाही.
माझ्या नवऱ्याची दारू सुटली
पण आता तो जुगाराच्या मागे लागलाय.
रोजचे २००-२५० रुपये उडवतो.
मी दोन एकरात शेती करते,
त्यातनं भागत नाही म्हणून ब्यूटी पार्लर चालवते.
मी घरच्या जाचाला विरोध केला.
आता माझ्याकडे पाहून इतर बाया पण धीट होत आहेत.”
- शेतकरी महिला, मु. हातगाव, जि. अकोला



# आमच्या मागण्या

- शेतकरी म्हणून ओळख व नोंदणी करा.
- शेतजमिनीवर अधिकार द्या.
- नैसर्गिक संसाधन व्यवस्थापनात स्त्रियांचा सहभाग अनिवार्य करा.
- जगण्यासाठी जंगलावर विसंबून असणाऱ्या महिलांच्या अधिकारांना मान्यता द्या.
- पशुपालन आणि मासेमारी करणाऱ्या महिलांच्या हक्कांची पूर्तता करा.
- पर्यावरणस्नेही शेतीला प्रोत्साहन द्या.
- ऊसतोड कामगार महिलांच्या अधिकारांचं रक्षण करा.
- आत्महत्याग्रस्त कुटुंबातील महिलांच्या अधिकारांची पूर्तता करा.

SOPPECOM

Makaam

# आमच्या मागण्या

सर्व शेतकरी महिलांना सामाजिक सुरक्षा उपाययोजना मिळतील हे सुनिश्चित करा.

कामाच्या ठिकाणी होणारा लैंगिक छळ (प्रतिबंध) कायद्यामध्ये शेती व निसर्गाधारित व्यवसायांचा समावेश करा.

स्वतःचं शेत, मजुरीसाठी जातात त्या सर्व जागा, मनरेगा, रोजगार हमीच्या कामाची ठिकाणं, कृषी उत्पन्न बाजार समिती, आडतं, बँक, इत्यादी जागांचा कामाच्या ठिकाणात समावेश करा.

कायदा अधिक प्रभावी व्हावा या दृष्टीने स्थानिक समित्यांना कायदेशीर अधिकार द्या.

तक्रार करणाऱ्या महिलांना सरंक्षण देण्याची तरतूद करा.

SOPPECOM

Makaam

# आमच्या मागण्या

सर्व कामाच्या ठिकाणी स्थानिक तक्रार निवारण समितीची (जिल्हा स्तर) माहिती देणारे फलक लावा.

ग्रामसभा पातळीवर अशा हिंसाचाराची दखल घेणारी यंत्रणा उभी करा.

शेतमालक, मुकादम,
मजुरीसाठी नेणारे कंत्राटदार,
आडतदार, सरकारी अधिकारी व कर्मचारी,
बँक कर्मचारी या सर्वांसोबत स्त्रियांवरील हिंसा
व कामाच्या ठिकाणी होणारा लैंगिक छळ
याविषयी जागरुकता मोहीम हाती घ्या.

स्थलांतरित कामगारांसाठी
जिथे काम करतात तिथे
कायद्याची माहिती देणारी शिबिरं घ्या.